स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

शिक्षणशास्त्र विषयातील पी.एच. डी. पदवीसाठी सादर करण्यात
येणाऱ्या संशोधनाची रूपरेषा

संशोधन विषय

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आग्रही प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांचा अध्यापनावर होणाऱ्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास

संशोधक

श्री. पंजाबराव किसनराव बच्छाव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस. एम. साखरे

(एम.ए., एम.एड., पी.एच.डी.)

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

सन २०१७

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव
१	प्रस्तावना
१.१	शीर्षक
१.२	संशोधनाची गरज
१.३	संशोधनाचे महत्व
१.४	समस्या विधान
१.५	संशोधनाची उद्दिष्टे
१.६	गृहीतके
१.७	परिकल्पना
१.८	पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या
१.९	संशोधनाची व्याप्ती
१.१०	संशोधनाची मर्यादा
२	संबंधीत साहित्याचा व संशोधनाचा आढावा
२.१	संबंधीत साहित्याचा आढावा
२.२	संबंधीत संशोधनाचा आढावा
२.३	प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण
३	संशोधनाची कार्यपद्धती
३.१	संशोधनाची पद्धती
३.२	संशोधनाची कार्यवाही
३.३	जनसंख्या
३.४	न्यादर्श
३.५	संशोधनाची साधने
३.६	संख्याशास्त्रीय परिमाणे
४	माहितीचे संकलन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन
	वेळापत्रक
	संदर्भसूची

१) प्रस्तावना

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय किंवा कोणत्याही जिव्हाळ्याच्या घटना असतील तर या सर्व प्रसंगी यशस्वी वाटाघाटी होण्याकरिता व्यक्तीमध्ये सहनशीलता आणि आक्रमक वृत्ती असायला हवी. जी.जी. शर्मा यांच्या मते, मित्रांशी वागतांना व्यक्तीमध्ये अत्यंत विनम्रतेची किंवा आज्ञाधारकपणाची प्रवृत्ती असेल तर त्या व्यक्तीमध्ये वैफल्य निर्माण होण्याची शक्यता असते. याच्या उलट आक्रमक व्यक्ती दुसऱ्याच्या गरजा आणि भावना यांच्याकडे दुर्लक्ष्य करते. त्यामुळे ती दुसऱ्यापासून दूर जाते. यामुळे स्वतःच्या आंतरवैयक्तिक गरजांच्या पुर्ती साठी कमी पडते. दोन्हीही अत्यंतिक टोके टाळण्यासाठी आग्रही प्रतिपादन करणे हा योग्य पर्याय आहे. यात दुसऱ्याच्या हक्क आणि जबाबदाऱ्या यांना योग्य न्याय दिला जातो.

या विषयीचे उत्तम उधारण म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष होय. व्यक्ती जेव्हा आपले न्याय हक्क व्यक्त करतांना दुसऱ्याच्या हक्काची पायमल्ली होवु नये अशा प्रकारच्या आंतरवैयक्तिक वर्तनाला प्रतिपादनशील वर्तन असे म्हणतात.

सामान्यतः या वर्तनाचे तीन प्रकारात वर्गीकरण करता येते.१)प्रतिपदनशील २) आक्रमक आणि ३) अनाग्रही आणि या सर्वांचा व्यक्तिमत्वाशी संबंध येतो. व्यक्तिमत्व म्हणजे काय तर इतरांवर पडणारी व्यक्तिची छाप होय. साधरणपणे व्यक्तिमत्वाचे तीन प्रकार आपण समाजात पाहतो एक म्हणजे अंतर्मुखी व दुसर्या बहिर्मुखी आणि क्वचित प्रसंगी दिसणारे उभयमुखी स्वभावाचे असतात. अंतर्मुखी हे कमी बोलणारे, लाजाळू, शांत वृत्तीचे असतात तर बहिर्मुखी समाजाभिमुख, उत्साही, बोलघेवडे, चारचौघात मिसळणारे असतात. आणि शिक्षक देखील एक समाजशील प्राणी आहे. त्याचा संबंध सर्वच क्षेत्रातील लोकांशी

येतो म्हणून त्याची प्रतीपादानशीलता व व्यक्तिमत्व याचा थोडातरी प्रभाव अध्यापनावर पडतो.

व्यक्तिमत्व-

इंग्रजीतील personality हा शब्द व्यक्तिमत्व म्हणून मराठीत वापरला जातो. रोमन काळातील नाटकात विविध पात्रे तोंडावर मुखवटे धारण करीत असत. त्या मुखवट्यांच्या आधारे आपापले स्वभावविशेष दाखवीत असत. इंग्रजीत वापरला जाणारा personality हा शब्द मूळ शब्द persona या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. Persona म्हणजे mask. मुखवटा असा याचा अर्थ होतो.जगाच्या रंगभूमीवर वावरत असताना एक प्रकारचा मुखवटा आपण धारण करीत असतो. या मुखवट्यावरून पुष्कळवेळा लोक आपल्याबद्दलचे मत बनवितात. पण व्यक्तिमत्व या अर्थाने ते अपुरे ठरते.

प्रत्येक व्यक्तीचे खास असे वैशिष्ट असते. वेगळेपण असते.या वेगळेपणाचा परिणाम इतर व्यक्तींवर होत असतो. व्यक्तिमत्व या संज्ञेचा अर्थ वेगवेगळ्या मानसशास्त्रज्ञांनी आपापल्या दृष्टीकोनातून वेगवेगळा केला आहे. व्यक्तीमत्वात सर्वसामान्यपणे शरीर, चेहरा, भाव, कौशल्य, अभिरुची, अभियोग्यता व विविध संपादित गुणांचा समावेश होतो.

अध्यापन-

अध्यापन हा शब्द जो इंग्रजीतील Teaching या शब्दाला पर्याय म्हणून वापरला जातो. Teaching या शब्दाचा अर्थ इंग्रजी शब्दकोशामध्ये पुढील प्रमाणे दिलेला आहे. The are of assisting another to learn याचा अर्थ एखाद्या व्यक्तीला अध्ययनासाठी मदत करणारी कला म्हणजे अध्यापन असा सांगता येईल. यामध्ये अध्यापन ही केवळ अध्ययनास मदतकरणारी बाब ठरते. यापेक्षा स्पष्ट अर्थ The world book of encyciopedia मध्ये दिलेला आहे. त्यानुसार

अध्यापन म्हणजे एक अशी प्रक्रिया की, ज्याव्दारा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला ज्ञान, कौशल्य व कला संपादन करण्यास मदत करते.

१.१ शीर्षक

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आग्रही प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांचा अध्यापनावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास

१.२ संशोधनाची गरज

आजच्या आधुनिक युगात प्रत्येक क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. रोज नवनवीन आव्हाने प्रत्येक घटकासमोर उभी आहेत. आणि याला शिक्षण क्षेत्र सुध्दा अपवाद नाही. या शिक्षण क्षेत्रात अनेक व्यक्तींशी शिक्षकाचा संबंध येत असतो. मग तो शिक्षणधिकारी असो की मुख्याध्यापक असो कि पालक. यांच्याशी त्याचे आंतरवैयक्तिक संबंध चांगले असले पाहिजे.

त्यांच्यात कोणताही संघर्ष निर्माण व्हायला नकोत. काही वेळेस शिक्षकाला शाळेतील अध्यापनाव्यतिरिक्त इतर कामेही त्याला करावी लागतात. या कामांचा अतिरिक्त ताण आल्यास त्याचा परिणाम अध्यापनावर होतो. मग तो वरिष्ठांनी दिलेल्या अतिरिक्त कामाला तो नाही म्हणत नाही. यामुळे तो अनाग्रही बनतो असे वारंवार होत राहिल्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व तशा प्रकारचे तयार होते. काहींमध्ये आक्रमक वृत्ती तयार होवून ते कोणचेही ऐकून घेत नाहीत. यामुळे त्याचे सहकाऱ्याशी नेहमी संघर्ष होत राहतो. ते इतरापासून दूर जातात अशांना आग्रही वर्तनाचे प्रशिक्षण देणे गरजेचे वाटते.

आग्रही वर्तन हे आंतरवैयक्तिक वर्तनाशी संबंधीत असून यात दुसऱ्याना न दुखवता आपले विचार आणि भावना मोकळेपणाने व्यक्त केल्या जातात त्यामुळे आग्रही वर्तन हे समाजाशी संबंधित असल्यामुळे महत्वाचे ठरते.

१.३ संशोधनाचे महत्व

देशाची भावी पिढी घडवणारा एक जबाबदर घटक म्हणून शिक्षकाकडे पहिले जाते तो विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत असतो. त्याच्या वर्तनाचा प्रभाव विद्यार्थ्यावर व तसेच त्या सभोवती संपर्क येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव पडत असतो. त्याच्यात दिसून येणारी प्रतीपादानशिलता हि कोणत्या प्रकारची आहे. काही शिक्षकांजवळ विषयासंबंधी ज्ञान खूप सखोल असते मात्र त्याला ते स्पष्ट करता येत नाही. म्हणजेच तो ते ठामपणे मांडू शकत नाही. या संसोधानाचे महत्व असे की शिक्षकाची प्रतिपादनशीलता कोणत्या प्रकारची आहे याची माहिती मिळेल.

१.४ समस्या विधान

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आग्रही प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांचा अध्यापनावर होणाऱ्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास

१.५ संशोधनाची उद्दिष्टे

संशोधन समस्या एक वा अनेक समस्या एकत्रित होऊन बनलेली असते. जी अडचण संशोधकाला वारंवार भेडसावत असते. जी गरज संशोधकाला सतत अनुभवास येते. अशा प्रमुख समस्येतून पृथ:करणाने एक वा अनेक छोटे प्रश्न निर्माण होतात. या विविध प्रश्नांना विधानात रुपांतरीत केल्याने संबंधित संशोधनाची उद्दिष्टे तयार होतात.

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील.

१) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आग्रही प्रतिपादनशीलतेचा शोध घेणे.
२) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणे.
३) ग्रामिण व शहरी भागातील शिक्षकांच्या प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्वाची तुलना करणे.
४) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या अध्यापनावरील परिणामाचा शोध घेणे.

१.६ गृहीतके

१) ग्रामिण भागातील शिक्षकांमध्ये आग्रही प्रतिपादनशीलता असते.
२) साधारणपणे बहिर्मुखी व्यक्तिमत्वाच्या व्यक्तीमध्ये आग्रही प्रतिपादनशीलता असते.
३) आग्रही प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्वाचा अध्यापनावर प्रभाव पडतो.
४) माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुषांच्या व्यक्तिमत्वात भिन्नता आढळते.

१.७ परिकल्पना

१) आग्रही प्रतिपादनशीलता ही माध्यमिक शाळेतील पुरुष शिक्षकांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येईल.
२) माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांमध्ये आग्रही प्रतिपादनशीलता कमी प्रमाणात आढळून येईल.
३) माध्यमिक शाळेतील स्त्री व पुरुष शिक्षकांत अध्यापनावर होणाऱ्या परिणामाच्या मध्यमान गुणांकात फरक आढळेल.
४) माध्यमिक शाळेतील ग्रामिण व शहरी भागातील शिक्षकांच्या मध्यमान गुणांकात फरक आढळेल.
५) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांच्यातील सहसंबंधात फरक आढळेल.

शुन्य परिकल्पना

१) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या आग्रही प्रतिपादनशीलतेच्या प्रमाणात सार्थ फरक दिसणार नाही.

२) माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षकांमध्ये आग्रही प्रतिपादनशीलतेच्या कमी प्रमाणात सार्थ फरक आढळणार नाही.

३) माध्यमिक शाळेतील ग्रामिण व शहरी भागातील शिक्षकांच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळणार नाही.

४) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळणार नाही.

५) माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या प्रतिपादनशीलता व व्यक्तिमत्व यांच्यातील सहसंबंधात सार्थ फरक आढळणार नाही.

१.८ कार्यात्मक व्याख्या

- **उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत्र**

१५ ऑगष्ट १९९० महाराष्ट्र राज्याच्या विधान मंडळाने मान्यता दिलेल्या महाराष्ट्र राज्यातील उत्तरेकडील जळगाव, धुळे व नंदुरबार या तीन विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी स्थापन करण्यात आलेले शासनमान्य विद्यापीठ.

- **आग्रही प्रतीपादनशिलता**

दुसऱ्याच्या मतांचा व भावनांचा आदर करून आपल्या भावना व विचार योग्य रितीने मांडणे म्हणजे आग्रही प्रतिपादनशीलता होय.

- **व्यक्तिमत्व**

व्यक्तिमत्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळा-बेरीज होय. - जी.ए.किम्बल

- **अध्यापन**

अध्यापन म्हणजे अध्ययनासाठी चेतना, मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रोत्साहन होय. - बर्टन

१.९ व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये जळगाव जिल्हयातील चार तालुक्यातील माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात येईल.
२) प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये जळगाव जिल्हयातील मराठी माध्यमांच्या ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात येईल.
३) ग्रामीण व शहरी माध्यमिक शाळेतील ६५० स्त्री व पुरुष शिक्षकांचा समावेश करण्यात येईल.
४) संशोधनासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या माध्यमिक शाळांचा समावेश करण्यात येईल.

१.१० मर्यादा

१) संशोधन हे माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित राहील.
२) संशोधन हे माध्यमिक शाळेतील इ.७ वी ते इ.१० वीच्या वर्गापर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांपुरातेच मर्यादित राहील.
३) संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या Ph.D. अभ्यासाअंतर्गत सन १९१७-१९२० पर्यंत मर्यादित राहील.
४) संशोधन जळगाव जिल्हयातील चार तालुक्यापर्यंतच मर्यादित राहील.

२) संबंधीत साहित्याचा व संशोधनाचा आढावा

२.१ संबंधीत साहित्याचा आढावा

- **आग्रही प्रतिपादनशिलता**

प्रतिपादनशिलता किंवा आग्रही वर्तन म्हणजे असे आंतर वैयक्तिक संबंध की ज्यामध्ये विचारांचे आणि भावनेचे प्रामाणिक आणि सरळ मार्गी प्रकटीकरण असते.

स्वतःचे अधिकार, हक्क, भावभावना, विचार, मत दुसऱ्याच्या अधिकारावर गदा येऊ न देता व्यक्त करणे म्हणजे आग्रहीपणा होय.

दुसऱ्यांच्या मतांचा व भावनांचा आदर करून आपल्या भावना व विचार योग्य रितीने व ठामपणे मांडणे म्हणजे ठाम प्रतिपादन किंवा आग्रहीपणा होय.

दुसऱ्या व्यक्तीच्या अधिकारांचा योग्य आदर करून आपल्या भाव-भावना व विचार यांचे योग्य रितीने व मनमोकळेपणाने केलेल्या प्रगटीकरणाच्या शिक्षणास आग्रहीपणाचे प्रशिक्षण असे म्हणतात.

- **आग्रही नसण्याची कारणे -**

समाजामध्ये अशी कित्येक लोक असतात जी आपली मते, भाव-भावना, विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकत नाहीत. याच्या पाठीमागे अनेक कारणे असतात. वर्तनवाद्यांच्या व अध्ययनवाद्याच्या मते, वर्तन हे संपादित असते. कारणे- सवयी, वैचारिक भूमिका, भिती आणि चिंता, धार्मिकता आणि परिस्थिती इ.

२.२ संबंधीत संशोधनाचा आढावा

१) सोनुने सुभाष (Ph.D.)

मराठवाडा विभागातील अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा व व्यक्तिमत्व वर्तन संघात प्रकाराचा तौलनिक अभ्यास.

२) डॉ. कावेरी एम. डहाळे (Ph.D.२००४)

जालना जिल्ह्यातील माध्यमिक शाळेत घेतल्याजाणाऱ्या उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर होणाऱ्या परिणामाचा चिकित्सक अभ्यास.

३) अंजली सूर्यवंशी (२०१५)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील अध्यापक महाविद्यालयातील अध्ययनार्थ्यांच्या अंतर्मुखी व बहिर्मुखी व्यक्तिमत्व गुणांचा तुलनात्मक अभ्यास.

४) vasnt Borkar(Ph.D. 2011,psycology)

A stday of the assertinevess, LOC & religiosity among hindu & muslim college going girls.

५) Mrs. Kumudini chudhari (Ph.D.1988)

Assertiveness nuaroticism & enternal-external LOC amongst females.

२.३) संशोधनाचे वेगळेपण-

व्यक्तिमत्व व प्रतिपादनशिलतेवर आधी संशोधने ही झालेले आहेत. मात्र ही एकत्रीत नसून वेगवेगळी आहेत. ती संशोधने अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी, गृहिणी, जीवन सहचारिणी, कामगार स्त्रीया यांच्यावर झालेली आहेत. मात्र ती शिक्षकांच्या अध्यापनावर झालेली नाही. हे या संशोधनाचे सांगता येईल.

३) संशोधनाची कार्यपद्धती

३.१ संशोधनाची पद्धती-

सदर संशोधनासाठी संशोधक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करेल.

३.२ संशोधनाची कार्यवाही-

समस्या निश्चित

↓

आराखडा निर्मिती

↓

आराखडा सादरीकरण

↓

आराखडा अंतिम मंजुरी

↓

संबंधित साहित्याचा आढावा

↓

साधन निर्मिती

↓

जनसंख्या व नमुना निवड

↓

साधनांच्या सहाय्याने माहिती गोळा करणे

↓

माहितीचे संकलन

↓

माहितीचे अर्थनिर्वचन

↓

निष्कर्ष व शिफारशी

↓

अहवाल लेखन

↓

सादरीकरण

३.३) जनसंख्या-

सदर संशोधनासाठी जळगाव जिल्हयातील चार तालुक्यातील माध्यमिक शाळांची जनसंख्या राहील.

३.४) न्यादर्श-

सदर संशोधनासाठी संशोधक यादृश्चिकन नमुना निवड पध्दतीचा वापर करेल.

३.५) संशोधनाची साधने-

डॉ. तसनिन नकवी यांची प्रतिपादनशीलता व न्यूमन कोहल्स्टेड व्यक्तिमत्व चाचणी वापरण्यात येईल.

३.६) संख्याशास्त्रीय परिमाणे-

सदर संशोधनासाठी संशोधक मध्यमान, प्रमाणविचलन, सहसंबंध गुणक यांचा वापर करेल.

४) माहितीचे संकलन विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

संशोधकाने माध्यमिक शिक्षकांची आग्रही प्रतिपादनशिलता आणि व्यक्तिमत्व यांचा शिक्षकांच्या अध्यापनावर होणाऱ्या परिणाम या समस्येला अनुसरून उद्दिष्टे मांडले. परिकल्पना, गृहीतक यांच्या पडताळणीसाठी संख्याशास्त्रीय परिमाणांच्या सहाय्याने विश्लेषण आणि अर्थ निर्वचन करण्यात येईल.

- **निष्कर्ष-**

उद्दिष्टे, परिकल्पना आणि सांख्यकिय विश्लेषणावरून निष्कर्ष काढण्यात येतील.

वेळापत्रक		
१)	विषय निश्चिती	-०१ ऑक्टो. ते १० ऑक्टो. २०१७
२)	तालुका व शाळा निश्चिती	-११ ऑक्टो. ते १५ ऑक्टो. २०१७
३)	प्रश्नावली तयार करणे	-१६ ऑक्टो. ते ३१ ऑक्टो. २०१७
४)	प्रश्नावली भरून घेण्यासाठी मुख्याध्यापकांची परवानगी घेणे	-०१ नोव्हे. ते ३१ डिसें. २०१७
५)	संबंधित शिक्षकांकडून प्रश्नावल्या भरून घेणे	-०१ जाने. ते ३१ डिसें. २०१८
६)	माहितीचे संकलन व अर्थनिर्वचन	-०१ जाने. ते १० मार्च. २०१९
७)	अहवाल / प्रबंध तयार करणे	-11 मार्च ते २० ऑगस्ट २०१९
८)	मार्गदर्शकाकडे तपासणीसाठी	-३१ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१९
९)	फेरदुरुस्ती करून प्रबंध तयार	-०१ सप्टेंबर ते ३१ डिसें. २०१९
१०)	लेदर बाईडिंगसह प्रबंध तयार	-०१ जाने. ते ३० मार्च. २०२०

- **संदर्भग्रंथ सूची-**

  - कुंडले डॉ. म.बा.,शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र,(२००३) ,श्री विद्या प्रकाशन, पुणे.
  - करंदीकर डॉ. सुरेश, शैक्षणिक मानसशास्त्र,(२००७), फडके प्रकाशन, पुणे.
  - कुलकर्णी के.वि., शैक्षणिक मानसशास्त्र (१९७७), श्री विद्या प्रकाशन, पुणे.
  - घोरमोडे के.यु.आणि क.कृ. शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,(२००८), विद्या प्रकाशन,नागपूर.
  - बर्वे डॉ. बी.एन. ताण आणि आरोग्यविषयक मानसशास्त्र,(२००८), विद्या प्रकाशन,नागपूर.
  - सिंह अरुणकुमार, उच्चतर सामान्य मनोविज्ञान,(२००६) मोतीलाल बनारसीव्दारा प्रकाशित दिल्ली.
  - शेवतेकर डॉ.शारदा, विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र,(२००६),), विद्या प्रकाशन,नागपूर.
  - Buch M.B. Fifth Survey of Research in Education New Dhelhi, NCERT.
  - Buch M.B. Six Survey of Research in Education New Dhelhi, NCERT.
  - Shodhganga.infibnet.ac.in

संशोधक

श्री पंजाबराव किसनराव बच्छाव

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एस.एम. साखरे

(एम.ए.,एम.एड. पी.एच.डी)

शासकीय अध्यापक विद्यालय,नांदेड